सकाळ
कोल्हापूर, शुक्रवार, २७ जून २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये आज रोजगार मेळाव्याचे आयोजन

कोल्हापूर, ता. २६ : मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत शुक्रवारी (ता. २७) पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा होणार आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्रातर्फे विवेकानंद कॉलेजच्या डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूटमध्ये हा मेळावा होईल. सकाळी दहा ते सायंकाळी चार या वेळेत हा मेळावा होणार असून पुण्यासह जिल्ह्यातील अठ्ठावीस आस्थापनांसाठी विविध पदांची भरती होणार आहे.

पुण्यातील महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीत तीनशे पदांची भरती होणार असून दहावी व आयटीआय विविध अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना येथे संधी असेल. उचगाव व कागल येथील घाटगे पाटील इंडस्ट्रीजमध्ये ९२ तर किर्लोस्कर ऑईल इंजीन्समध्ये १८५ पदांची भरती होणार आहे. आयटीआय, डिप्लोमा व पदवीधारक उमेदवारांना येथे संधी असेल. त्याशिवाय इतर आस्थापनांतही विविध संधी उपलब्ध असतील. विविध योजनांची माहितीही मेळाव्यात दिली जाणार आहे. मेळाव्यासाठी येताना बायाडोटाच्या पाच प्रती घेऊन उमेदवारांनी यावे, असे आवाहन केले आहे.

.6.2025

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, २७ जून २०२५

## विवेकानंद महाविद्यालय

विवेकानंद महाविद्यालयामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. अवधूत टिपुगडे यांनी 'राजर्षी शाहू महाराज कार्य आणि कर्तृत्व' या विषयावर विचार मांडले. डॉ. दत्ता जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष कोळी यांनी आभार मानले. याप्रसंगी डॉ. श्रृती जोशी, प्रा. बी. एस. कोळी, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. शिल्पा भोसले, डॉ. ई. बी. आळवेकर, प्रा. एम. आर, नवले, एस. के. धनवडे आदी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद

शुक्रवार, २७ जून २०२५

## विवेकानंद कॉलेज

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. कुंभार म्हणाले, बहुजन समाजात शिक्षणाचे नवनवे प्रयोग शाहू महाराज यांनी केले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याचा करवीर संस्थानामधला शाहूंचा आदेश भविष्यकाळात समाजात आमूलाग्र बदल घडविणारा ठरला. यावेळी डॉ. अवधूत टिपुगडे, डॉ. दत्ता जाधव, डॉ. संतोष कोळी, डॉ. श्रृती जोशी, प्रा. बी. एस. कोळी, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. शिल्पा भोसले, डॉ. ई. बी. आळवेकर, प्रा. एम. आर, नवले आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी
। शुक्रवार, २७ जून २०२५

## विवेकानंद कॉलेज

विवेकानंद कॉलेजमध्ये प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. कुंभार, डॉ. अवधूत टिपुगडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. दत्ता जाधव यांनी केले. आभार डॉ. संतोष कोळी यांनी मानले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, स्टाफ सेक्रेटरी प्रा. बी. एस. कोळी, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. शिल्पा भोसले, डॉ. ई. बी. आळवेकर, प्रा. एम. आर. नवले, प्रबंधक एस. के. धनवडे आदी उपस्थित होते.